

# थोडंसं मनातलं . . .

- अमिता कोकाटे

सर्व मित्र मैत्रिणींना नमस्कार......

भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्थेच्या स्थापनेला 28 वर्षे होऊन गेली. या 28 वर्षात संस्थेने स्वतःची वास्तू बांधण्यासाठी स्वतःची हक्काची जागा चिरड येथे घेण्यापर्यंत प्रगती केली आहे. ह्या वाटचालीत संस्थेचे सदस्य, कार्यकर्ते, पदाधिकारी, हितचिंतक, देणगीदार यांचा खूप मोठा वाटा आहे.

दिव्यांगांना एकत्र आणणे, एकमेकांसोबत सुखदुःख वाटून घेणे, एकमेकांना अडचणीत सहाय्य करणे, ह्यासाठी भरारी संस्थेच्या माध्यमातून एक सांधणारा दूवा निर्माण झाला. संस्थापक अध्यक्ष श्री. विजय उर्फ भाऊ प्रधान व डॉ. अंजली आपटे, ह्यांच्या मार्गदर्शनाखाली इतर अनेक सहकार्यांच्या सहकार्याने दिव्यांगांसाठी विविध उपक्रम केले गेले. उदा. डोंबिवली व आसपासच्या परिसरातील दिव्यांगांना अपंगत्व दाखला, रेल्वे कन्सेशन्स मिळवून देण्यासाठी वैद्यकीय शिबिरांचे सातत्याने आयोजन, कॅलिपर्स क्रचेस-स्प्लीन्टस इत्यादी अत्यावश्यक साधने उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित हॉस्पिटल्स-संस्थांमध्ये गरजूंना घेऊन जाणे, उदरनिर्वाहासाठी शिलाई मशिन्स, घरघंटी सारखी उत्पन्न साधने देणगी म्हणून गरजूंना देणे. त्याचबरोबर बाह्य जगाची ओळख व्हावी, आनंद घेता यावा यासाठी दिव्यांगांना जवळपास तसेच दूरच्या सहलींना नेणे, नाटक चित्रपटांना घेऊन जाऊन त्यातील कलाकारांशी ओळख करून देणे. वर्धापन दिन, पोपटी सारख्या कार्यक्रमातून दिव्यांग व इतर कलाकारांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, इत्यादी छोट्या मोठ्या उपक्रमांद्वारे आनंदाची देवाण घेवाण संस्थेच्या माध्यमातून अनेक वर्षे होत आहे.

संस्थेचे सदस्य तसेच इतरही दिव्यांगांसाठी 'अपंगालय- जेष्ठालय' हा चिरड येथील प्रस्तावित वास्तूत साकार होणारा मोठा प्रकल्प (सध्या भाड्याच्या जागेत हे काम सुरू आहे.) येथे अंशतः दिव्यांग, पूर्णतः परावलंबी लहानथोर व्यक्ती काही काळासाठी अथवा तहहयात राहू शकतात. संस्थेतील सेवातत्पर सेवकवर्ग, संस्था समिती सदस्य, सेवाभावी कार्यकर्ते, ह्या सर्वांच्या सहाय्याने अपंगालयातील रहिवाश्यांची योग्य ती काळजी घेतली जाते. त्यांच्या सर्व गरजा पूर्ण केल्या जातात. हेच काम संस्थेच्या स्वतःच्या वास्तूत स्थलांतरीत झाल्यावर अधिक सोयी सुविधा उपलब्ध होतील.मात्र त्यासाठीच संस्थेशी संबंधित सर्वांना, हे अगत्याचे-स्नेहाचे-सहकार्याचे आवाहन आहे व त्याला योग्य तो प्रतिसाद आपणा सर्वांकडून मिळेल याची खात्रीही. संस्थेशी संबंधित सर्वांचे मनापासून आभार. धन्यवाद!

आपली,
**अमिता कोकाटे**
अध्यक्ष.
**भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्था, डोंबिवली.**
कार्यकारी मंडळाच्या वतीने

# आपली 'भरारी'....

भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्था दि. 3 डिसेंबर,1996 रोजी जागतिक अपंग दिनाच्या दिवशी स्थापन झाली. अपंगांना आत्मविश्वासाने जगता यावे ही संकल्पना प्रथम कै. विजय उर्फ भाऊ प्रधान व डॉ. अंजली आपटे यांच्या मनात साकार झाली व बारा अपंग व्यक्ति एकत्र येऊन भरारीची सुरूवात झाली,

**भरारी च्या कार्याचा माहितीपट संस्थेच्या वतीने तयार केला असून यासाठी खास भरारी गीत डॉ. प्रमोद बेजकर यांनी लिहिले असून श्री विश्वास पाटणकर यांनी संगीतबद्ध केले आहे. सदर माहितीपटाचा पेनड्राईव्ह कार्यालयात नाममात्र शुल्कात उपलब्ध आहे.**

## आपण भरारीसाठी काय करू शकता ?

भरारी चे कार्यकर्ते होऊ शकता.
तुमचे कौशल्य व ज्ञानाचा भरारी ला उपयोग होईल.
अपंगांना नेहमी लागणारी साधने देणगी देऊ शकता.

# ॠणनिर्देश

भरारीच्या यशात सहभागी असणारे सभासद, हितचिंतक, सल्लागार, मार्गदर्शक, कर्मचारी, संचालक मंडळ, उपनिबंधक खाते, बँकर्स यांचे मोलाचे सहकार्य मिळत असते. तसेच लेखापरिक्षक यांनीही वेळोवेळी योग्य सल्ला दिला. लोढा हेवन, कल्याण-शीळ रोड, निळजे येथे अपंगालयाची सुरूवात झाली. सदर सदनिका डॉ. तारा नाईक व श्री. एम.एस.नाईक ह्यांनी सुरूवातीची सात वर्षे विनाअट उपलब्ध करून दिली म्हणूनच आम्ही येथवरची यशस्वी वाटचाल करू शकलो. त्याबद्दल भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्था या सर्वांची ऋणी आहे, त्रिवार धन्यवाद !

# 'भरारी' विषयी अधिक माहिती व संपर्क

**भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्था**
द्वाराः सीमा चंद्रकांत देशपांडे
शॉप नं.4, विपा सोसायटी,
रामवाडी, अगरवाल हॉलजवळ,
मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व)
जि.ठाणे 421201
मोबाईल क्र. 9167949320

**भरारी अपंगालय**
103-104, बि.नं. 14, लव्हेंडर,
रिजन्सी इस्टेट, कल्याण-शीळ रोड,
डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे 421203
**सौ. संध्या प्रधान (खजिनदार)**
**मोबाईल क्र.: 9987067944**
**सौ. जयश्री बांदेकर (व्यवस्थापक)**
**मोबाईल क्र. : 9222816292**


**अमिता कोकाटे (अध्यक्ष) : 7738384538**
**डॉ. अंजली आपटे (कार्याध्यक्ष) : 9892072788**
**विनायक थत्ते (जनसंपर्क अधिकारी) : 9819633383**

.

email : bharariavs@gmail.com

website : www.bharari.ngo

# पुण्यस्मरण



**विजय उर्फ भाऊ प्रधान**

**- संस्थापक -**

**भरारी अस्थिव्यंग विकलांग संस्था, डोंबिवली**

## OUR 'BHARARI'

Bharari Asthivyanga Vikalanga Sanstha was established on 3rd December, 1996. "To enable the physically challenged persons through Creative Humanism was the thought in the minds of Late Bhau (Vijay) Pradhan, Dr. Anjali Apte with the 12 physically challenged persons it came into existence in the form of 'Bharari'.

A documentary about 'Bharari' is produced by the organization. An inspirational theme song 'Bharari' is written by Dr. Pramod Bejkar & tunes composed by Shri. Vishwas Patankar. Pendrive of the documentary is available in the office at nominal cost.

## What could I do for 'Bharari'

Can become a volunteer.....
Your skill & knowledge can be helpful....
Can donate for daily equipments for physically challenged....

## ThankYou!

There is a valuable support from members, volunteers, consultants, guides, employees, directors, registrars, bankers to 'Bharari'. The auditors also gives appropriate advice from time to time. Bharari Apangalaya was started at Lodha Heaven, Nilje initially in the premises owned by Dr. Tara & Mr. M.S. Naik without restrictions, thats why we could progress. 'Bharari Asthivyanga Vikalang Sanstha' is grateful to all the above people. **Thank you very much !**

**More contact information about 'Bharari'**

**Bharari Asthivyanga Viklanga Sanstha, Dombivli**
C/o Seema Chandrakant Deshpande
Shop No.4, Vipa Society, Ramwadi,
Near Agarwal Hall, Manpada Road,
Dombivli (E), Dist Thane
Mob : 9167949320

**Bharari Apangalaya**
103-104, B.No. 14, Lavender,
Regency Estate, Kalyan Sheel Road,
Dombivli (E), Dist. Thane 421203.
**Mrs. Sandhya Pradhan (Treasurer)**
**Mob. 9987067944**
**Mrs. Jayashree Bandekar (Manager)**
**Mob : 9222816292**

**Amita Kokatay (President) Mob : 7738384538**
**Dr. Mrs. Anjali Apte (Working President) Mob : 9892072788**
**Vinayak Thatte (P.R.O.) Mob : 9819633383**

email : bharariavs@gmail.com website : www.bharari.ngo

# वाटचाल...२०२३-२०२४

आपल्या भरारी अ.वि. संस्थेचा सत्ताविसावा वर्धापन दिन दि. 03 डिसेंबर, 2023 रोजी डोंबिवली येथील स्वयंवर सभागृहात संपन्न झाला. डॉ. मंगेश देशपांडे (अर्थोवेद चिकित्सालयाचे संचालक- आयुर्वेद वाचस्पती) अध्यक्ष म्हणून व श्री. उल्हास कार्ले (संचालक -समर्थ भारत व्यासपीठ, सिग्नल शाळा)प्रमुख पाहुणे म्हणून आणि श्री. राहूल काळे (दिव्यांग समाजसेवक) विशेष अतिथी म्हणून सन्माननीय व्यक्तींनी वर्धापन दिनाची शोभा वाढवली.

अपंगालयातील सेवक वर्ग, रहिवासी आजी मंडळी यांनी विविध मनोरंजनाचे छोटे कार्यक्रम सादर केले. त्यानंतर भरारीची माहिती सांगणारी छोटी चित्रफित दाखवण्यात आली. सन्माननिय पाहुण्यांच्या हस्ते संध्या प्रधान आणि मामा शिर्के यांच्या कल्पनेतून तयार झालेल्या चांद्रयान प्रतिकृती माध्यमातून स्मरणिकेचे प्रकाशन अभिनव पद्धतीने झालं. भरारीच्या सर्वांना सहाय्य करण्याच्या भूमिकेतून यथाशक्ती सहाय्य गरजू व्यक्तींना दरवर्षी करण्यात येतं, यावर्षीही विठ्ठलवाडी येथील श्री. गौरव ह्या दिव्यांगास ट्रायसिकल देण्यात आली. बक्षिस समारंभात वर्धापन दिनानिमित्ताने आधीच अपंगालयात घेण्यात आलेल्या (तेथील आजी-आजोबा सेवकवर्ग) विविध स्पर्धांतील विजेते तसेच सभागृहात घेण्यात आलेल्या 'भाऊ तिथे खाऊ' ह्या खाद्य स्पर्धेतील विजेत्यांना आणि वर्षभरातील निष्ठापूर्वक कार्याचे कौतुक म्हणून सर्वोत्कृष्ठ सेवकास पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. संस्थेच्या आजवरच्या कामात सातत्याने वेगवेगळया पद्धतीने सहकार्याचा हात आपुलकीने देणाऱ्यांप्रती वाटणारी कृतज्ञता संस्थेने सदर व्यक्तींना पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करून व्यक्त केली व संस्थेशी जोडले गेलेल्यां बरोबरचे ऋणानुबंध दृढ झाले.

डॉ. मंगेश देशपांडे (अध्यक्ष), श्री. उल्हास कार्ले (प्रमुख पाहुणे), श्री. राहूल काळे (विशेष अतिथी),त्याचबरोबर टिळकनगर पोलिस स्टेशन अधिक्षक श्री. उमेश गीते, सिग्नलशाळा संचालक श्री. भटु सावंत, श्री. साधले सर, इत्यादी मान्यवरांनी आपल्या मनोगतात भरारी संस्थेच्या कार्याचे मनापासून कौतुक करून शुभेच्छा दिल्या.संस्थेच्या आगामी प्रकल्पात सहकार्याचे आश्वासन दिले. पाहुण्यांच्या मनोगत सत्कारानंतर, दिपाली आपटे ग्रीन व सहकाऱ्यांचा संगीत कार्यक्रम होऊन श्रम-परिहारार्थ उपस्थित सर्वांचे भोजन होऊन वर्धापनदिनाचा कार्यक्रम पूर्णत्वास गेला.

अमेय पालक संघटना आणि क्षितिज मतिमंद शाळा ह्यांना सतरंज्या भेट म्हणून देण्यात आल्या.

- 22 जानेवारी, 2024 - अयोध्या येथील श्रीराम मंदीर प्रतिष्ठापनेचा आनंद, अपंगालयात श्रीराम प्रतिमेचे श्रद्धेने व भक्तीने पूजन व रामरक्षा स्तोत्र-मारूती स्तोत्र पठण तसेच 108 वेळा त्रयोदशाक्षरी रामनाम तारक मंत्र सामुदायिकरित्या जप करून, व्यक्त केला गेला. श्रीरामांच्या आरतीनंतर उपस्थितांना गोड शिरा व कॉफी देण्यात आली.

● 28 जानेवारी, 2024 - संस्थेच्या चिरड येथील जागेवर पोपटीचा कार्यक्रम झाला. त्यानिमित्ताने उपस्थितांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना कौतुकपर बक्षिसे देण्यात आली. सुरेल गाण्यांच्या अंताक्षरीने कार्यक्रमात बहार आली. थोड्याशा मौज-मनोरंजना नंतर सर्वांनी पोपटीच्या विशेष खाद्यपदार्थाचा आस्वाद घेतला. साधारणपणे 70 व्यक्ती पोपटीच्या कार्यक्रमास उपस्थित होत्या.

● 03 फेब्रुवारी, 2024 - भरारी संस्थेच्या अमिता कोकाटे यांनी त्यांची भाची देवकी हिच्या विवाहप्रित्यर्थ अपंगालयातील रहिवासी-सेवकवर्ग यांसाठी मिष्टान्न भोजन दिले. सदर प्रसंगी संस्थेतर्फे देवकिची ओटी भरून भेटवस्तू देऊन स्नेहभाव व्यक्त केला. ह्या कार्यक्रमास भावे मावशी, डॉ. अंजली आपटे, संध्या प्रधान, शुभांगी काटदरे, व मनिषा दीक्षित संस्थेतर्फे उपस्थित होत्या.

● 10 फेब्रुवारी, 2024 -कै. शरद पेंडसे यांच्या स्मरणार्थ अनुराधा पेंडसे यांजकडून अपंगालयात गोडाचे जेवण देण्यात आले.

● 03 मार्च, 2024 - रिजन्सी इस्टेट मधील अपंगालयाच्या नविन जागेमध्ये शास्त्रोक्त पद्धतीने गणेशपूजन झाले. संस्थेचे कार्यकर्ते श्री. विक्रम वैद्य ह्यांनी पत्नी सोबतीने अगत्यपूर्वक यजमान म्हणून पूजा केली. सदर कार्यक्रमास आपटे मॅडम, संध्या प्रधान, सीमा देशपांडे, अजित प्रधान, श्री व सौ. थत्ते, शुभांगी काटदरे, जयश्री बांदेकर, सुशिला ठाकूर, लिलाताई शिंगोळे यांनी विशेष मेहनत घेतली.

● 19 मार्च, 2024 - क्षितीज मतिमंद शाळेसाठी व्हीलचेअर भेट म्हणून देण्यात आली.

● 28 मार्च, 2024 - अपंगालयातील सर्वात ज्येष्ठ (वय वर्षे 99) पिंपुटकर आजी यांच्या स्मरणार्थ सर्व सेवक वर्ग, संस्था समिती सदस्य, यांनी आजींच्या प्रतिमेस पुष्पहार घालून वंदन केले. आजींच्या आठवणी जागवल्या, नंतर श्रीमती वर्षा नाईक (आजींची कन्या) यांनी उपस्थितांना आजींच्या स्मृति निमित्त भोजन दिले.

● 09 एप्रिल, 2024 - नववर्ष शोभायात्रेत दरवर्षी प्रमाणेच यावर्षीही अपंगालयातील आजी-आजोबा रहिवासी मंडळींना घेऊन संस्थेचे कार्यकर्ते, पदाधिकारी सहभागी झाले होते. सजविलेल्या टेम्पो, रिक्षातून तर काहीजण चालत ह्या शोभायात्रेत सहभागी होऊन वाटेत भेटणाऱ्यांना संस्थेची माहिती सांगत होते. टेम्पो-रिक्षावर लावलेल्या बॅनर्समधून भरारी संस्थेची झलक उपस्थिताना दिसत होती.

● 11 एप्रिल, 2024 - निखिल शिवाजी शिंदे या विद्यार्थ्यास त्याच्या गरजेप्रमाणे विशेष व्हीलचेअर बनवून घेऊन, त्याला भेट म्हणून देण्यात आली.

● 17 एप्रिल, 2024 - रामनवमीच्या दिवशी अपंगालयात रामजन्मोत्सव साजरा करण्यात आला. सजवलेल्या पाळण्यात राम प्रतिमा ठेऊन 'पाळणे' म्हटले. सामुदायिक रित्या रामरक्षा पठण व रामनामाचा जप करण्यात आला. नंतर उपस्थितांना खिरापत-शिरा-आंबा डाळ व पन्हे प्रसाद म्हणून देण्यात आले.

● 01 मे, 2024 - श्री विजय उर्फ भाऊ प्रधान (भरारीचे संस्थापक व माजी अध्यक्ष) यांच्या 15 व्या स्मृतिदिनी, भरारीच्या कोषाध्यक्षा संध्या प्रधान व संस्थेचे सल्लागार अजित प्रधान (भाऊंचे भाऊ आणि वहिनी) व

अपंगालयातील सेवक वर्गाने कै. भाऊंच्या प्रतिमेला पुष्पहार घालून वंदन केले. त्यादिवशीचे जेवण भाऊंच्या आवडीचे केले होते.

- 23 मे, 2024 - डोंबिवली जायंट क्लब-सहेली यांच्यातर्फे अपंगालयात स्नेहभेट व भोजन देण्यात आले.
- 03-04-18-23 जुलै, 2024 - ह्या दिवशी अपंगालयातील सेविका सुशिला ठाकूर, भरारी हितचिंतक कु. सिद्धी परब, अपंगालयातील रहिवासी मंगला जोशी, तसेच उषा भावे यांचे वाढदिवस त्यांचे औक्षण करून व भेटवस्तू देऊन साजरे करण्यात आले. सिद्धीच्या वाढदिवशी तिच्या पालकांनी सकाळचा नाष्टा अपंगालयात दिला.
- 04 जुलै, 2024 - उदय पाटणकर यांजकडून कै. परशुराम पाटणकर यांचे स्मरणार्थ अपंगालयात भोजन प्रदान करण्यात आले.
- 15 जुलै, 2024 - अमेय विनायक सोहोनी स्मृतीप्रित्यर्थ अपंगालयात भोजन देण्यात आले.
- 04 ऑगस्ट, 2024 - दीप अमावस्ये निमित्त अपंगालयात दिव्यांभोवती आरास करून दीप पूजन करण्यात आले. पुरणाचा नैवेद्य दाखविण्यात आला.
- रोटरी क्लब ऑफ ठाणे - ग्रीन स्पॅन्स ह्या संस्थेच्या डॉ. कांचन जयवंत, वैशाली दाभाडे, ॲड पूजा ढोक, शिवानी गडकरी आणि डॉ. अदिती देशकर आजरेकर (अंकना ॲकॅडमी ऑफ डान्स अँण्ड म्युझिक) यांचा शिष्यगण ह्यांचे अन्नदान व सदिच्छा भेट.
- 15 ऑगस्ट, 2024 - अपंगालय, लव्हेंडर येथे झेंडावंदन करून भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.
- 20-23 ऑगस्ट, 2024 - अपंगालय रहिवासी अनुराधा पेंडसे व अपंगालय व्यवस्थापन सहाय्यक विनायक लेले यांचा वाढदिवस औक्षण करून,भेटवस्तू देऊन साजरा करण्यात आला.
- 21 ऑगस्ट, 2024 - अपंगालयात उदकशांतीचा कार्यक्रम झाला. संस्थेच्या वतीने विनायक लेले व लक्ष्मी लेले यांनी यजमान म्हणून ही उदकशांत केली.
- 07 सप्टेंबर, 2024 - गणेशोत्सवा निमित्ताने अपंगालयात गणेश मूर्तीची आकर्षक सजावटीत प्रतिष्ठापना केली गेली. लेलेंनी गणेशाची पूजा केली. पेंडसे आजींनी पूजा सांगितली. राजू पटवर्धन यांनी 121 अथर्वशीर्ष आवर्तने केली. महाआरती, प्रसादाचे जेवण झाल्यावर अपंगालयातील सेवक वर्गाने नृत्य-गायनादी कला सादर करून सर्वांचे मनोरंजन केले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पर्यावरण पूरक गणेश विसर्जन करण्यात आले.
- 13 सप्टेंबर, 2024 - अपंगालय 'साईधारा टॉवर्स' येथील शेजारी संगिता सूर्यवंशी ह्यांनी अपंगालयाच्या नविन जागेत सदिच्छा भेट दिली. त्यादिवशी त्यांचा वाढदिवस असल्याने त्यांना औक्षण करून भेटवस्तू देण्यात आली.
- 09 ऑक्टोबर, 2024 - संस्थेच्या हितचिंतक व लाईफ मेंबर भारती मुश्रीफ यांचा वाढदिवस अपंगालयात मोठ्या उत्साहात औक्षण करून, भेटवस्तू देऊन सर्वांनी साजरा केला. भारती मुश्रीफ यांनी सर्वांना मिठाई देऊन तोंड गोड केले.

# सखी लता

आमच्या अपंगालयातील 'सखी लता' वर्धापन दिनाच्या निमित्ताने तिच्या आठवणी जाग्या झाल्या, त्याच मांडतेय तुमच्यासमोर.

मी अपंगालयात कामाला आले आणि लता धोत्रे हिच्याशी माझी ओळख झाली. लताला नीट स्पष्टपणे बोलता येत नव्हते. अगदी मोजक्या शब्दांत तिचे बोलणे अथवा प्रतिसाद असायचा. सुरूवातीला 'हो गं', 'जा गं', मानेनेच नाही म्हणणे. एखादी गोष्ट आवडली तर तिच्या चेहऱ्यावर हसू उमटे. सहजच, अगदी निरागस होता तिचा आनंद. अपंगालयातील छोटी छोटी कामे करताना तिला समाधान वाटत असावे, असे तिच्याकडे पाहताना जाणवे.

लताचा सर्वसाधारण दिनक्रम म्हणजे, सकाळी उठून स्वतःचे तोंड-हात-पाय धुवून झाले की पेशंटचे पाणी पिण्याचे तांबे-पेले घासण्यासाठी गोळा करून आणणे, पेशंटना सकाळचा पहिला चहा नेऊन देणे,(त्यातही चहा कोणाला आंघोळी आधी लागतो, व कोणाला नंतर हवा असतो, हे तिच्या बरोबर लक्षात असे.) पेशंटचे घासलेले तांबे-पेले पुन्हा सर्व पेशंटना नेऊन देणे, गरम पाणी-साधे पाणी हे ही गरजेप्रमाणेच पेशंटना देणे, पेशंटचा चहा झाला की सर्व चहाचे पेले गोळा करून घासण्यास परत नेणे, ही काम करत असतानाच मध्येच इतर सेवक वर्ग तिला हाक मारून सांगे, ''अक्का, जरा पेशंटचे कपडे आणून दे. दुसरी चादर आण, पेशंटला जरा मदत कर'', तर लता शांतपणे त्या कामातही मदत करत असे.

सुरूवातीची कामे झाल्यावर लताची आंघोळ-देवाला नमस्कार, चहा नाश्ता झाल्यावर, खोल्यांतील केर काढणे, भाजी निवडणे, पेशंटचे खरकटे उष्टे हात धुणे, बेडपॅन धुवायला नेणे, इत्यादी छोटी छोटी कामे करत तिचा दिवस पुढे पुढे जात राही.

एक गमतीची गोष्ट म्हणजे आपटे मॅडमना तिच्या हातूनच पाणी प्यायला हवे असायचे. त्यांना नेमके काय-कसे हवे ते तिला बरोबर कळत असे, असे त्यांचे म्हणणे होते व मलाही निरीक्षणाअंती पटले होते. कारण फ्रिज मधील थंड पाण्याची बाटली काढून योग्य प्रमाणात ग्लासमध्ये ओतून त्यात योग्य प्रमाणात साधे पाणी मिक्स करणे, हे तिला कसे कळते याचे मला कौतुक वाटे (लताचा आय.क्यू.तसा कमी असल्याने तिच्या या छोट्या छोट्या कृतींचे सर्वांना खुपच कौतुक असायचे व ते रास्तही होते)

माझ्या माहितीप्रमाणे भाऊ काकांना (विजय प्रधान) लताच्या बहिणीने विनंती केल्यानंतर ती (लता) आपल्या संस्थेत आली. सुरूवातीला तिला काहीच कळत नसे. तिचा प्रतिसादही कमी असल्याने, 'ती इथे कशी राहणार? तिचे पुढे कसे निभावेल?' असे प्रश्न सर्वांना पडले होते. परंतु भरारी मधील घरगुती-अगत्याच्या वातावरणामुळे हळुहळू तिच्यात सकारात्मक बदल होत गेले, ही खूप चांगली गोष्ट झाली, तिची समज थोडीफार वाढली तसा तिचा प्रत्येक

गोष्टीतला प्रतिसाद वाढला. उदा. 'अपंगालयात आजी आजोबा पैसे भरून राहतात, पण माझ्याकडे पैसे नाहीत, मग मी कशी राहू इथे?' असा प्रश्न तिला पडला. मग तिच्या दिवसभराच्या कामासाठीचे पैसे महिना अखेरी तिच्या हातात देऊन, 'हे तुझे पैसे, आता तुझ्याकडे पैसे आहेत, चिंता करू नकोस' अशी समजूत घातली.

वैयक्तिक स्वच्छता,वगैरे गोष्टी तिला शिकवाव्या लागल्या. त्या ती शिकत गेली, थोडफार अडखळत पण वाक्य बोलायला लागली. अपंगालयात सीमा जोग आली की कापड घेऊन कपडे शिवून देण्यास सांगणे, शुभांगी काटदरे आल्यावर स्वतःला आवश्यक त्या वस्तू आणण्यास सांगणे, संध्या प्रधानांना खुणा करून मटण-मच्छी आणण्यास सांगणे, आपटे मॅडम आल्यावर अपंगालयातील झालेली एखादी तूटफूट, नळ गळतोय, बल्ब गेला आहे, इत्यादी गोष्टी कानावर घालणे. रिक्षावाल्यांशी तिचे राखीचे नाते होते, रक्षाबंधनाच्या दिवशी आवर्जून ती सर्वांची वाट पहायची.

अपंगालयातील सर्वांशी तीचे प्रेमाचे-आपुलकीचे नाते होते, तेथील सर्व स्टाफही तिला खूप जीव लावायचा, तिची मनापासून काळजी घ्यायचा, तिला काय हवे-नको ते पहायचा, तिच्या वैयक्तिक स्वच्छतेची -गरजांची आठवणीने पूर्तता करायचा. भरारी संस्थेने तिच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया करवून घेतली. भरारी संस्थेशी व संस्थेतील सर्वांशी लताचे ऋणानुबंध इतके घट्ट होत गेले होते की, इतक्या वर्षात कधीतरी ती बहिणीच्या घरी रहायला गेली तर हट्ट धरायची लगेच भरारीत परत येण्याची.

वर्षभरापूर्वी लताचे अल्पशा आजाराने निधन झाले व आता ती सर्वांच्या आठवणीत भरून राहिली आहे. अशी आमची लता नावाची सखी, सांगाव्या तेवढ्या आठवणी कमीच आहेत पण विस्तार भयास्तव थांबावे लागतेय.


**- जयश्री बांदेकर (अपंगालय, व्यवस्थापक)**

# भावपूर्ण श्रद्धांजली



**कै. श्रीमती प्रतिभा प्रभाकर भावे**





**कै. डॉ. विनायक शंकर आपटे**

# संस्थेचा प्रमुख प्रकल्प आहे अपंगालय –ज्येष्ठालय

सुरूवातीची सात वर्षे डोंबिवली नजिकच्या लोढा हेवन, निळजे या ठिकाणी डॉ तारा नाईक यांनी संस्थेच्या प्रेमाखातर देऊ केलेल्या ब्लॉकमध्ये अपंगालय सुरू होते. आता ते 103-104, बिल्डींग नं. 14, लव्हेंडर, रिजन्सी इस्टेट, कल्याण-शीळ रोड, डोंबिवली (पूर्व) येथे सुरू आहे. अपंगालय म्हणजे अपंगांचे घर. जे घर प्रत्येक अपंगाला वावरायला सोयीचं असेल, जिथे पूर्णतः परावलंबी अपंगांचा/ज्येष्ठांचा मानाने, प्रेमाने व सेवाभावी वृत्तीने सांभाळ केला जाईल ही प्रमुख संकल्पना! निसर्गरम्य असलेल्या या प्रशस्त जागेत निवास व मनोरंजनाबरोबरच फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी दिली जाते. शिवाय या ठिकाणी तात्पुरत्या काळासाठीही अपंगांची राहण्याची सोय करण्यात येते. संस्थेने 'चिरड येथे स्वतःची जागा घेतली आहे. ह्या ठिकाणी नवीन होणा-या वास्तुमध्ये हेल्थ केअर सेंटर, डे केअर सेंटर, तसेच अपंगांना लागणा-या विविध गोष्टींचे वर्कशॉप सुरू करण्यात येईल. डे केअर सेंटर म्हणजे अपंग व्यक्तीला, तिच्या घरून आणून पूर्ण दिवसभर त्या व्यक्तीची शारिरीक व मानसिक काळजी घेऊन संध्याकाळी त्या व्यक्तीला पुन्हा घरी नेऊन सोडण्यात येईल.

**अपंगालयातील प्रवेशासंबंधी :** संस्थेतील तज्ज्ञ व जबाबदार डॉक्टर पेशंटची शारिरीक व मानसिक अवस्था बघून प्रवेश देऊ अथवा नाकारू शकतात. प्रवेशाच्या वेळी काही चाचण्या करून घेणे बंधनकारक आहे, पेशंटच्या शारिरीक अवस्थेनुसार त्याच्याकडे द्यावे लागणारे कमी-अधिक लक्ष यानुसार मासिक शुल्क ठरते. तसेच प्रवेशाच्या वेळी संस्था काही रक्कम अनामत म्हणून घेते. वास्तव्य काळात पेशंटचे निधन झाल्यास अथवा पेशंट कायमस्वरूपी घरी गेल्यास ही रक्कम परत मिळते.

**अधिक माहिती व प्रवेशासंबंधी संपर्क साधा :**

**अध्यक्ष -** अमिता कोकाटे - 7738384538 **कार्याध्यक्षा -** डॉ. अंजली आपटे - 9892072788

**जनसंपर्क अधिकारी -** विनायक थत्ते - 9819633383 **खजिनदार -** सौ. संध्या प्रधान - 9987067944

**The major project of Bharari - 'Apangalaya / Jyeshthalaya'!**

We started this project in 2003 at Lodha Heaven, Nilje, Near Dombivli in the premises offered to us by Dr. Tara Naik, After seven years we shifted it to the present location at 103/104, Bldg No. 14, Lavender, Regency Estate, Kalyan Sheel Road, Dombivli (East) The Apangalaya is functioning in this spacious place .

Apangalaya is the home for the physically challenged persons! A home suitable for their barrier free movements. The Concept behind this home is to shelter any person/senior citizen with total disability. They are looked after with utmost care. We provide not only the accomodation and food but also the physiotherapy and occupational therapy to the residents. We even offer here the facility of short duration stay for physically challenged person. We have recently purchased a land at village Chirad, Taloja MIDC Road, for Apangalaya project. The proposed project consits of apangalaya, Health Care Centre, Day care centre, Workshop for repairing and producing various items required by physically challenged people etc. The concept of Day care centre is to bring a physically challenged person from home in the morning, take his/her care the whole day and drop back to home in the evening.

**Admission in Apangalaya :** Doctors on Bharari's panels inspect the applicants for their physical & mental condition. Some medical tests are mandatory before admission. Admission is the sole discretion of Bharari's panel, Monthly charges and other charges are decided upon the physical condition of the patient. Additionally, some amount is also accepted as deposit at the time of admission. This deposit is retruned in case the patient is departed/discharged from Apangalaya.

**For More Contact :**

**Amita Kokatay (President) Mob : 7738384538**

**Dr. Anjali Apte (Working President) Mob : 9892072788**

**Vinayak Thatte (P.R.O.) Mob : 9819633383 - Sandhya Pradhan (Treasurer) Mob. : 9987067944**

**विशेष हार्दिक आभार... विशेष हार्दिक आभार...**

सातत्याने दरमहा आर्थिक मदत करणारे श्री. प्रमोद श्रोत्री व क्रांती येवले

लव्हेंडर येथील जागेसाठी मोलाची मदत करणाऱ्यांचे आभार ...
सौ. रेश्मा मनिष जोशी, लव्हेंडर मधील सर्व रहिवासी व पदाधिकारी यांचे आभार

**त्रिवार धन्यवाद**

ब-याच मोठ्या समारंभाप्रसंगी भरारीला आपली जागा सहज वापरण्यास देणारे
देवदत्त आपटे (दीपदत्त), देशपांडे कुटुंबिय (विपा सोसायटी),
प्रफुल्ल तेरसे (राजगार्डन सोसायटी)
ह्यांचेही आम्ही अत्यंत आभारी आहोत. धन्यवाद ! त्रिवार धन्यवाद !!

**हार्दिक अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा** !!

भरारी परिवाराशी निगडीत असलेल्या विद्यार्थी मित्र-मैत्रिणींचे यशाबद्दल अभिनंदन
व येणा-या परीक्षांसाठी शुभेच्छा.

**अठ्ठाविसावा वर्धापन दिन, दि. ०१ डिसेंबर, २०२४**

स्वयंवर हॉल अल्प दरात उपलब्ध करून देणारे - श्री. स्वप्नील किरकिरे यांचे हार्दिक आभार.

**अल्पोपहार व जेवण**

श्री. कुमार भालके, श्री. सुहास फाटक, श्री. श्रीधर जोशी यांजकडून

**'भाऊ तेथे खाऊ' पाककला स्पर्धेची पारितोषिके**

श्री. विक्रम व विराज प्रधान यांचेतर्फे

**वर्धापन दिन स्पर्धांची पारितोषिके**


मानसी मुकुंद जोशी व रोहिणी सदाशिव फाटक यांचेतर्फे

राजू वडनेरकर यांच्याकडून वर्धापन दिनासाठी हॉलचे भाडे

# भरारी व अपंगालय प्राप्त देणग्या 2023-2024

| | |
|---|---|
| दिनकर खरे | 40,763 |
| चैतन्य यशवंत देवधर | 30,000 |
| संजना व्ही. केळकर | 25,000 |
| कै. सुनिती साने स्मरणार्थ | |
| मोहन दातार | 25,000 |
| जगदीश वैद्य | 25,000 |
| विलास ठुसे | 25,000 |
| एक हितचिंतक | 20,000 |
| प्रिती कानिटकर | 20,000 |
| निखिल अगरवाल | 20,000 |
| राजन वढावकर | 20,000 |
| कै.सौम्या वढावकर स्मरणार्थ | |
| केदार दाणी | 20,000 |
| रोहिणी गुरूनाथ नरेंद्र | 20,000 |
| सुधांशु दानोले | 11,111 |
| जयश्री बांदेकर | 11,001 |
| कै. प्रभावती बांदेकर स्मरणार्थ | |
| लव प्रदीप नाफडे | 11,000 |
| केशव मधुसुदन कुलकर्णी | 11,000 |
| महेंद्र घाडगे | 11,000 |
| मनोहर ओक | 11,000 |
| मनोहर ओक | 11,000 |
| भाग्यश्री दत्तात्रय मराठे | 11,000 |
| एक हितचिंतक | 10,001 |
| एक हितचिंतक | 10,001 |
| रेवाळी शिधये | 10,000 |
| सुधीर रायकर | 10,000 |
| प्रल्हाद जोशी | 10,000 |
| कै.गिरीजा सदाशिव जोशी स्मरणार्थ | |
| दिलीप जोशी | 10,000 |
| कै. लिला आठल्ये स्मरणार्थ | |
| विनायक थत्ते | 10,000 |
| उमेश जयवंत | 10,000 |
| कै. शालन जयवंत स्मरणार्थ | |
| अर्पित कोल्हटकर | 10,000 |
| कै. राम कोल्हटकर स्मरणार्थ | |
| उमेश जयवंत | 10,000 |
| वर्षा नाईक | 10,000 |
| संध्या पटवर्धन | 10,000 |
| विद्या दिघे | 10,000 |
| एक हितचिंतक | 10,000 |
| मिनल एस. सुदामे | 10,000 |
| महेश देशपांडे | 10,000 |
| सुनिल सुधाकर गडकरी | 10,000 |
| अर्चित आनंद भावे | 10,000 |
| श्रीप्रसाद महाजन | 10,000 |
| स्वामी समर्थ पेंट | 10,000 |
| डॉ.सुनिल जी. परांजपे | 10,000 |
| प्रेमा सुरेंद्रन | 10,000 |
| वंदना दुर्वे | 10,000 |
| एक हितचिंतक | 10,000 |
| सुजाता पोंक्षे | 10,000 |
| सुधीर रायकर | 10,000 |
| अनुपम बन्सल | 10,000 |
| कै. अशोक व डॉ.उषा बन्सल स्मरणार्थ | |
| प्रीयांका राजपुरकर | 6,000 |
| अभय पी. भावे | 6,000 |
| रेणुका सदानंद कामत | 6,000 |
| अमेय सोहोनी | 6,000 |
| उदय पाटणकर | 6,000 |
| रेणुका सदानंद कामत | 6,000 |
| राजाभाऊ पाटकर | 5,500 |
| अनुराधा सिंग | 5,100 |
| अनुराधा सिंग | 5,100 |
| डॉ. बि.पी. अगरवाल | 5,001 |
| योगेश धर्माधिकारी | 5,001 |
| अशोक पी.कामत | 5,001 |
| स्वाती कामत | 5,001 |
| मिना ढापरे | 5,000 |
| मनिषा कोपरकर | 5,000 |
| कै. इंदुमती कोपरकर स्मरणार्थ | |
| एक हितचिंतक | 5,000 |
| एक हितचिंतक | 5,000 |
| डॉ. श्रीनिवास जुवळे | 5,000 |
| प्रसाद जठार | 5,000 |
| संध्या माधव जोशी | 5,000 |
| लिला शिंगोळे | 5,000 |
| कै. चंद्रकांत शिंगोळे स्मरणार्थ | |
| सुप्रिता सोहोनी | 5,000 |
| अश्विनी संजय पांचाळ | 5,000 |
| विश्वास आर. मराठे | 5,000 |
| कोठारे मेटलॅब | 5,000 |
| सुनिल गोखले | 5,000 |
| डॉ. श्रीनिवास जुवळे | 5,000 |
| माघवन मेहेंदळे | 5,000 |
| पूजा सचिन ढोक | 5,000 |
| विनीत वसंत गडकरी | 5,000 |
| संजी | 5,000 |
| मिनल सुदामे | 5,000 |
| सर्वेश कयाळ | 5,000 |
| माधुरी अजय गडकरी | 5,000 |
| सुषमा महाडेश्वर | 5,000 |
| प्रकाश ताम्हणे | 5,000 |
| जयेश जोशी | 5,000 |
| सर्वेश कयाळ | 5,000 |

| | |
|---|---|
| गीता चेतन माळी | 5,000 |
| डॉ. ऐश्वर्या अजित नाडकर्णी | 5,000 |
| आशा गोविंद लिमये | 4,000 |
| लता सोमण | 4,000 |
| उर्वी गुप्ते | 4,000 |
| प्रतिभा थत्ते | 3,601 |
| सविता आपटे | 3,150 |
| राजन गुप्ते | 3,000 |
| अविनाश पाटील | 3,000 |
| विनायक वैद्य | 3,000 |
| जयश्री बांदेकर | 3,000 |
| आशा गोविंद लिमये | 3,000 |
| मुकुंद मोरेश्वर पुराणिक | 2,501 |
| एम.बि. बिरादार | 2,500 |
| विनोद सोपले | 2,100 |
| प्रफुल्ल मोरे | 2,100 |
| कै. दामोदर मोतीराम मोरे स्मरणार्थ | |
| कृष्णा मोहन | 2,001 |
| एक हितचिंतक | 2,001 |
| माधुरी भावे | 2,001 |
| विनायक थत्ते | 2,000 |
| मंजिरी सागर बागायतकर | 2,000 |
| राजश्री जोशी | 2,000 |
| सविता अनिल आपटे | 2,000 |
| अरूणा कुलकर्णी | 2,000 |
| सुगंधा दिघे | 2,000 |
| कै. अशोक दिघे स्मरणार्थ | |
| वैभव कुलकर्णी | 2,000 |
| संगीता माधव पुरकर | 2,000 |
| श्रीधर विश्वनाथ जोशी | 2,000 |
| शोभा धोपेश्वरकर | 2,000 |
| सुरेखा शिंदे | 2,000 |
| एक हितचिंतक | 2,000 |
| अनिल आपटे | 2,000 |
| साधना जोशी | 1,500 |
| पाटील | 1,500 |
| अद्वैत दुबे | 1,500 |
| जयश्री बांदेकर | 1,200 |
| अविनाश पाटील | 1,200 |
| अनंत कृष्णाजी भावे | 1,100 |
| योगेश धर्माधिकारी | 1,012 |
| सुभाष रामचंद्र देशपांडे | 1,011 |
| सुमती कडेगांवकर | 1,011 |
| कै.विनायक गोविंद कडेगांवकर स्मरणार्थ | |
| बेलसरे | 1,001 |
| एक हितचिंतक | 1,001 |
| मृदुला | 1,001 |
| विनोद वासा | 1,001 |
| लक्ष्मी विनायक लेले | 1,001 |
| विनोद सोपले | 1,001 |
| श्रीकांत भट | 1,000 |
| एक हितचिंतक | 1.000 |
| मधुरा रानडे | 1,000 |
| दैदिप्यराज डेरे | 1,000 |
| प्रभाकर सोमण | 1,000 |
| बृहद अभ्यंकर | 1,000 |
| अविनाश पाटील | 1,000 |
| सुनंदा साने | 1,000 |
| अविनाश पाटील | 1,000 |
| लक्ष्मीकांत भालेराव | 1,000 |
| प्रभाकर पुरूषोत्तम पिंगळे | 1,000 |
| एक हितचिंतक | 1.000 |
| गीता वाड | 1,000 |
| सीमा जोग | 1,000 |
| वृषाली विजय टिकेकर | 1,000 |
| कै. राधाबाई टिकेकर स्मरणार्थ | |
| श्रीकांत गद्रे | 800 |
| एक हितचिंतक | 600 |
| शितलाबाई धायरे | 505 |
| सुरेश बालिगा | 501 |
| नागेश काळे | 501 |
| अर्जुन कुडतरकर | 501 |
| शैलजा जोशी | 501 |
| साधना जोशी | 501 |
| मीराताई कुलकर्णी | 501 |
| निखिल शिवाजी शिंदे | 501 |
| सुषमा मांद्रेकर | 501 |
| कै. मंदाकिनी पाटकर स्मरणार्थ | |
| अनुराधा पेंडसे | 501 |
| अंजली वेलणकर | 500 |
| शोभा धोपेश्वरकर | 500 |
| शेखर गोडबोले | 500 |
| श्वेता जिग्नेश शहा | 500 |
| प्रकाश गायकवाड | 500 |
| शिल्पा भोर | 500 |
| गीता बबन कदम | 500 |
| रविंद्र परांजपे | 251 |
| विद्या गावकर | 202 |
| जयश्री प्रकाश जोशी | 202 |
| सुनिता राजवाडे | 200 |
| जगदीश यादव | 200 |
| सौ. देशपांडे | 101 |



## आम्ही आभारी आहोत ! आम्ही आभारी आहोत !! आम्ही आभारी आहोत !!!

### संस्था - कार्यालये - व्यावसायिक ...

| | | |
|---|---|---|
| टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ | ज्येष्ठ नागरिक संघ,डोंबिवली | गणेश मंदीर संस्थान |
| आश्रय ट्रस्ट | सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे | डोंबिवली नाग.सह,बँक लि. |
| बँक ऑफ इंडिया, डोंबिवली | डोंबिवली पोलीस स्टेशन | सावित्रीबाई फुले नाट्यगृह |
| मानपाडा पोलीस स्टेशन | सेंट्रल हॉस्पिटल, उल्हासनगर | मयुरेश डिजिटल प्रिंटींग (बॅनर्स) |
| उर्जा फाऊंडेशन | रोटरी क्लब | इनरव्हील क्लब |
| सुसेवा एन जी ओ क्लिनिक | पाटकर ट्रस्ट | |

### विविध क्षेत्रातील मान्यवर ...

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. सदानंद थरवळ | श्री. उदय कर्वे | आ. राजू पाटील | श्री. सुधीर जोगळेकर |
| श्री. शरद उर्फ तात्या गंभीरराव | श्री. तात्यासाहेब माने | श्री. स्वप्निल किरकीरे | सौ. जयश्री कर्वे |
| श्री. रामनाथ सोनावणे | श्री. राजेश मोरे | श्री. भा. गो. म्हात्रे | श्री. मनोज घरत |
| सौ. मंगला सुळे | श्री. राहूल कामत | श्री. राहूल दामले | श्री. विश्वजीत पवार |
| श्री. जयंत पित्रे | श्री. महेश गुप्ते | श्री. प्रवीण दुधे | श्री. भगवान मंडलिक |
| श्री. अभय कोठारे | श्री. विश्वनाथ बिवलकर | श्री. प्रमोद सामंत | श्री. संजीत वायंगणकर |

## नेहमीचे तत्पर सहकारी. . .

श्रेयस श्रृंगारपुरे, प्रसाद जठार, संतोष मोरे, प्रकाश गायकवाड, श्री. विनोद राणे, योगेश कुसुरकर, सलिल पाटणकर, डॉ. रविंद्र पालकर, महेश मुंगी, श्री.संजीव मांद्रेकर, श्री. मामा शिर्के, अच्युत देसाई, श्री. विनय लिमये, अलंकार सावंत, श्री. सुर्यकांत वाणी, श्री. विनोद गोरी, श्री. मोहन तुळपुळे, श्री.चंद्रशेखर बेजकर, श्री. मिलींद पाटणकर, प्रदीप मेहता, श्रीमती उषा कशेळकर, शमा धोपेश्वरकर, सौ. राजश्री जोशी, सौ. मानसी भावे, सौ. वाणी, सौ. माधवी पाटणकर, सौ. भारती सावंत, सौ. गीतांजली मालवणकर, चित्रा महाजन, देवकी कोकाटे, जयेश जोशी, श्री. कांचन व शाम चौहान, आझाद खान, नवनाथ पाटील, प्रभाकर पाटील, यादव, शिवा निचरे, रघुवीर, जगदीश यादव, भारती मुश्रीफ, दीपक चव्हाण, वीणा जोशी, मनाली आपटे, श्री. संजय, सौ. नीता कोपरकर, ग्लोबल मालवणी - विजय पांचाळ, एकनाथ दुदवाडकर, प्रसाद पवार, सतीश गुजर, सचिन आचरेकर, श्रृती उरणकर,तन्मयी व तेजस उरणकर, सौ. सुनिता महाडिक देसाई, शिवानी जोग, मृगा गोरे, शिल्पा कशेळकर, रेखा कशेळकर, मीना देढिया, चित्रा सावंत, विपूल वैद्य.

## भरारी व अपंगालय वस्तुरूप देणग्या(२०२३ ते २०२४)

डॉ. अंजली आपटे
लायन्स क्लब - नवी मुंबई
सौ. प्रिती फाळके
कै.श्रीनिवास सावंत
नम्रता कडेचुर
श्री. शुक्ल
सौ. किर्ती सुर्यवंशी
नामदेव अनंत जाधव
संजय मोरे
संध्या कश्यप
स्वामी समर्थ परिवार (नाना करंदीकर)
विराज प्रधान
डोंबिवली जायंट्स ग्रुप ऑफ सहेली
न्यू जलाराम स्टोअर्स
जान्हवी पुराणिक

अनुराधा सिंग
सतिश शहा
सतिश वैशंपायन
नेहा म्हात्रे
भूपेन लाईटवाला
जयश्री बांदेकर
विवेक लिमये
अद्वैत पुराणिक
मनोज विश्वकर्मा
सुरेखा कदम
क्रांती जाधव
मिलींद वानखेडे
सविता बेहरे

अमित भास्करन
अमूल डिस्ट्रीब्युटर-निशिगंधा
सीमा जोग
अनघा रानडे
आभा कुलकर्णी
प्रेमा सुरेंद्रन
सुनिता श्रीनिवास सावंत
सौ. शुभांगी काटदरे
अर्जून कुडतरकर
श्री. धबाब
सुषमा मांद्रेकर
श्री. तिवारी
रोटरी क्लब ऑफ ठाणे,
ग्रीनस्पॅन्स

**स्पासा रबर इंडस्ट्रीज, प्रभादेवी - टीव्ही व डेस्कटॉप**

**भारती मुश्रीफ - व्हीलचेअर**

**दिलीप यादव क्रिएटीव्ह एंटरप्रायझेस - चहा प्रायोजक**

### भावपूर्ण श्रद्धांजली

कु. लता धोत्रे
डॉ. प्रज्ञा दोषी
वनिता अढळीकर
बंडू अढळीकर
श्रीनिवास सावंत
मोरेश्वर एकनाथ बेजकर
शोभा मोरेश्वर बेजकर

वंदना फाटक
संध्या कुलकर्णी
अंकिता पटवर्धन
सदाशिव पटवर्धन
वीणा पटवर्धन
अनुबाई रागों हजारी

उषा अहिरे
डॉ. नंदू तोरसेकर
प्रभावती अनंत बांदेकर
शुभांगी मोहिले
सुमती दत्तात्रय लेले
मयुरेश विनायक लेले

**ह्या सर्व कुटुंबियांच्या दुःखात संस्था सहभागी आहे.सर्व मृतात्म्यास सद्गती लाभो हीच प्रार्थना**

## विनम्र आवाहन. . .

भरारी ने मौजे चिरड, तळोजा काँक्रीट रोड, ता. अंबरनाथ येथे 22 गुंठे जागा विकत घेतली आहे, तेथे सुसज्ज अपंगालय,डे केअर सेंटर,वर्कशॉप, प्रशिक्षण केंद्र असा प्रकल्प उभा राहणार आहे. त्यासाठी अधिकाधिक आर्थिक मदतीचे आवाहन आहे. या देणग्या आयकर कायद्याअंतर्गत 80जी सवलतप्राप्त आहेत. देणगीचे चेक्स-ड्राफ्ट 'भरारी अ.वि. संस्था, डोंबिवली' या नावे काढावा. आपण भरारी च्या खात्यात नेट बँकिंगद्वारेही देणगी जमा करू शकता.

## An Appeal For Donations ...

Bharari has purchased 22 gunthas at Taloja Concrete Road, Moje Chirad, Taloja. There will be a project with Apangalaya, Day Care Centre,Well equipped Workshop and Training Centre. There is an urgent need for financial help.These donations are avaiable under 80G Tax exemptions under the Income Tax Act. Donation Cheques/Drafts drawn by name "Bharari AV sanstha, Dombivli" You can add donations through Net Banking to Bharari account.

**Dombivali Nagri Sahakari Bank A/c No. 002010100064048 IFSC : DNSB0000002**
**Bank of India A/c No. 009510100029317 IFSC BKID0000095**
**If you pay direct to the A/c, Please share the screen shot.**

## आजी, माझी आजी ।

उंचीने कमी,पण दिसायला गोरीपान
अशी ही माझी आजी दिसते खूप छान ।।१।।

एका पायाने अपंगआणि आले एका डोळ्यास अंधत्व,
तरीही तिने केले खुप परिश्रम असेआहे तिचे कतृत्व

शिस्त व व्यवस्थितपणा यांचे करते काटेकोरपणे पालन,
वेळेबरोबर धावणारे आहे तिचे जीवन !

आजी माझी आजी करते माझ्यावर खूप प्रेम,
मला काही झाले की तिचे मन होतं अस्वस्थतेने पेन,

माझी ही आजी जरी असली वयाने म्हातारी,
मनाने तरीही ती तरूणच आहे, ही बात हाय लय भारी ।।

आज तुझा वाढदिवस मी कसा विसरणार?
तुला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्याशिवाय, माझ्या मनाला
नाही करमणार,

वरण-भात-तूप-मीठ देतेस मला कालवून,
त्याचबरोबर देतेस मला आशीर्वाद, तू भरभरून !

इतेच थांबतो आता, देऊन तुला वाढदिवसच्या शुभेच्छा !
घेशील ना माझा गोड गोड पापा ?

**- प्रतीक भावे**

# अनाथांची माय- आजची दुर्गा- सिंधुताई !

राष्ट्र कवी मैथिली शरण गुप्त यांची एक कविता मनाला खुप भावते, स्पर्श करते ते म्हणतात,

"अबला जीवन हाय तुम्हारी यही कहानी,
आँचल में है दूध और आँखो में पानी."

गौतम बुद्ध ज्ञान प्राप्तीसाठी यशोधरेला सोडून निघून गेले, तेव्हा तिच्या मनाची व्यथा येथे स्पष्ट होते. पूर्वीपासून स्त्री जीवन हे असेच आहे. घरातील सर्वांसाठी कष्ट सोसायचे पण तिच्या नशिबी मात्र येते ती उपेक्षाच.

पण एक अबला स्त्री हार न मानता कशी दुर्गा होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ.

सिंधुताईंचा जन्म १९ नोव्हेंबर, १९४८ साली वर्धा जिल्ह्यातील पिंप्री मेघे या गावात अभिमन्यू साठे या गुराख्याच्या घरी झाला. अभिमन्युच्या आईला व पत्नीला मुलगा हवा होता. पण झाली मुलगी! त्याचा राग त्या दोघींनी आयुष्यभर सिंधुताईंवर काढला. मुलगी झाली या रागाने त्यांनी तिचे नाव 'चिंधी' ठेवले. चिंधी हुशार व एकपाठी होती. पण खुप लहानपणी तिचे लग्न लावून आईने व आजीने तिला घराबाहेर काढले. आणि याचे समाधान त्या दोघींना आयुष्यभर होते.

अभिमन्युचा जीव मात्र चिंधीसाठी तुटत होता. तिने खुप शिकावं, प्रगती करावी अशी त्यांची इच्छा होती. पण घरच्या मंडळींपुढे त्याचे काही चालले नाही.

वयाच्या १२व्या वर्षी चिंधीचे लग्न तिच्यापेक्षा वीस वर्षांनी मोठ्या श्रीहरी सपकाळ यांच्याबरोबर झाले. तिथेही तिला जावेचा व सासुचा खूप सासुरवास सहन करावा लागला. खूप पाणउतारा सहन करावा लागला. पण त्याही परिस्थितीत सिंधू ने शिक्षणाचा ध्यास सोडला नाही. शेण, लाकुडफाटा गोळा करायला गेल्यावर रस्त्यात सापडलेले कागदांचे तुकडे ती आणून उंदराच्या बिळात लपवून ठेवीत असे. व एकटे असताना त्याचे वाचन करी. अठराव्या वर्षापर्यंत तीची तिन बाळंतपणे झाली.

एका प्रसंगात तिच्यातली दुर्गा जागी झाली. गावातल्या बायका आपल्या संसारासाठी लाकडं, शेण गोळा करायच्या, आणि हे शेण जमीनदार दमडाजीकडे जमा करायच्या, त्याची त्यांना अतिशय कमी किंमत मिळत असे. दिवसभर तंगडतोड करून हाताला काहीच लागत नव्हते. पण जमिनदाराच्या दादागिरीमुळे कुणीच काही बोलू शकत नव्हते. तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करावा लागत होता.

चिंधी म्हणजे लग्न झाल्यावरच्या सिंधूने हे सर्व पाहिले व त्या विरूद्ध तिने पहिले बंड पुकारले.

वन खात्याने त्याची दखल घेतली व स्त्रियांना योग्य मजुरी मिळू लागली.

पण या समाजसेवेची सिंधुला जबरदस्त किंमत चुकवावी लागली. नुकसान झाल्यामुळे जमीनदार दमडाजी तिचा कट्टर शत्रू झाला व सिंधूला बदनाम करून तिला नामोहरम करण्यासाठी त्याने तिचे चारित्र्य हनन करायला सुरूवात केली. त्यावेळी सिंधू गरोदर होती. दमडाजी सर्वांना सांगत सुटला की, त्याचे व सिंधुचे अनैतिक संबंध आहेत व तिला होणारे मुल हे त्याचेच आहे. दमडाजीच्या या अपप्रचारा मुळे घरातले सर्व सिंधूवर चिडले. पतीही तिच्यावर संशय घेऊ लागला. आणि त्यांनी तिला घरातून हाकलून दिले. सिंधू गोठ्यात राहू लागली. गोठ्यातच तिने धारदार दगडाने नाळ कापून आपल्या कन्येला जन्म दिला.तिच्या मदतीला कोणी नव्हते.

नंतर तिला तिथूनही हाकलण्यात आले. ज्यांच्यासाठी तिने लढा दिला ते कोणीच तिच्या मदतीला आले नाही. माहेरीही आईने तिला आसरा दिला नाही.

प्रसंगी स्मशानात ठेवलेले पिंड चितेवर गरम करून तिने आपले पोट भरले. भीक मागून ती आपले व कन्येचे पोट भरू लागली. एकदा तर तिने आत्महत्येचाही प्रयत्न केला. पण नंतर मुलीसाठी जीवनाचा संघर्ष करण्याचा निश्चय केला.

सिंधू भिक मागून पोट भरू लागली. पण त्याही परिस्थितीत ती इतरांना मदत करत होती. मिळालेली भिक्षा इतर भिकाऱ्यांमध्ये वाटून ती खाऊ लागली. त्यावेळी नकोशी असलेली, सोडून दिलेली अनाथ मुले पाहून तिच्या हृदयातील ममता तिला स्वस्थ बसू देईना, अनाथ बालकांच्या हाल अपेष्टा पाहून सिंधू त्यांची आई झाली. आपल्या मुलीमुळे या मुलांकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून तिने आपली मुलगी ममता हिला दगडुशेठ हलवाई यांच्या संस्थेत दाखल केले. आणि आता ती अनाथ मुलांची आई बनली. शेकडो मुलांसाठी आशेचा किरण बनलेल्या सिंधूला मुले 'माई' म्हणू लागली.

सिंधूने आता त्यांच्यासाठी संघर्ष सुरू केला. अनाथ मुलांच्या मदतीसाठी समाजापुढे पदर पसरला.अशा नकोशा असलेल्या अनाथ मुलांना सांभाळून तिने त्यांच्यावर चांगले संस्कार केले. त्यांना शिक्षण दिले. नोकरी किंवा उद्योगधंद्याला लावून एक चांगले स्वावलंबी नागरिक बनवण्याचे महत्वाचे काम सुरू केले. बरीच वर्षे अथक परिश्रम व कष्ट केल्यानंतर त्यांनी चिखलदरा येथे या मुलांसाठी पहिला आश्रम बांधला. त्यासाठी पायाला चाके बांधून त्या गावोगावी हिंडू लागल्या व पैसे जमा करू लागल्या.

पंधराशे मुलांच्या त्या आई म्हणजे माई झाल्या. त्यांच्या या मुलांपैकी अनेक मुले डॉक्टर, वकील व इतर उच्च स्थानावर काम करतात.







**पॅरालिंपिक २०२४ मधील भारतीय विजेते - एकूण पदके २९**

अवनी लेखरा, मोना अग्रवाल, प्रिथी पाल, मनीष नरवाल, रूबिना फ्रान्सिस, निशाद कुमार, योगेश कथुमिया, नितेश कुमार, तुलसीमाथी मुरूगेसन, मनिषा रामदास, सुहार यथीराज, राकेश कुमार, शितलादेवी मिश्र, सुमित ॲन्टील, नित्या श्री सिवन, दिप्ती जीवनजी, सुंदर सिंग गुर्जर, अजित सिंग, मरिअप्पन थांगावेलू, शरद कुमार, सचिन खिलारी, हरविंदर सिंग, धरम बिर, प्रणव सुरमा, कपिल परमार, प्रविणकुमार, होकाटो सेमा, सिमरन सिंग, नवदीप सिंग.

सिंधुताईंनी व्याघ्र संरक्षण प्रकल्पामुळे ८४ आदिवासी गावातील बेघर झालेल्या आदिवासी लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी संघर्ष केला व त्यांना न्याय मिळवून दिला. सरकारकडून त्यांची योग्य ती व्यवस्था करून घेतली.

घरातून हाकलल्यानंतर एकाकी माईंचा आता खूप मोठा परिवार झाला. मृत्युपूर्वी त्यांना ३८२ जावई व ४९ सुना होत्या. अनाथ मुलांसाठी त्यांनी जो संघर्ष केला त्या सामाजिक कार्यासाठी २०२१ साली पद्मश्री हा बहुमूल्य पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. २०१७ साली राष्ट्रपतींकडून त्यांना नारीशक्ती पुरस्कार मिळाला. शिवाय इतर सातशे पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले.

अशा या 'अनाथांची आई सिंधुताई' म्हणजेच माई यांचे दिनांक ४ जानेवारी २०२२ रोजी पुण्याच्या गॅलेक्सी हॉस्पिटल मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. एका अबले पासूनचा तो निस्वार्थी दृढनिश्चयी ममता माई दुर्गेपर्यंतचा त्यांचा प्रवास खरोखरच अत्यंत प्रेरणादायी आहे.

स्त्री ने ठरविले तर नारीची नारायणी होऊ शकत हेच माईंनी आपल्या जीवनातून दाखवून दिले. म्हणूनच आपण असे म्हणू शकतो,

'दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती.'

सिंधुताई या दुर्गेला माझे कोटी कोटी प्रणाम.

**- सौ. रेखा विजय जोशी**

**अनुपम बन्सल रू. २०,००,०००/-**
**कै. अशोक व डॉ. उषा बन्सल स्मरणार्थ**
**प्रसाद वसंत गाडगीळ रू. ५,००,००१/-**
**कै. नंदिनी गाडगीळ स्मरणार्थ**
**उमेश महाजन रू. १,५०,०००/-**
**कै. रघुनाथ वामन मुळे स्मरणार्थ व कै.वसुंधरा रघुनाथ मुळे स्मरणार्थ**
**एक हितचिंतक रू. १,००,००१/-**
**केशव दत्तात्रय परांजपे रू. १,००,०००/-**
**हिरालाल बालगोविंददास चॅरीटेबल ट्रस्ट रू. १,००,०००/-**
**अभय वासुदेव भावे रू. ५१,०००/-**
**डॉ. वीणा गडकरी रू. ५०,०००/-**
**प्लासमेक इंजिनिअरिंग रू. ५०,०००/-**
**कनेक्टवेल इंडस्ट्रीज प्रा.लि. रू. ५०,०००/-**
**वर्षा ए. नाईक रू. ५०,०००/-**
**कै. अशोक नाईक स्मरणार्थ**
**दिनकर पुरूषोत्तम खरे रू. ४१,२४५/-**

## हिंमत (लघुकथा)

ट्रेकिंगच्या तुमच्या या मोहिमेला माझ्या मनापासून हार्दिक शुभेच्छा गाईज..... मोहीम जरी काहीशी अवघड असली तरी मी दिलेल्या या ऑन लाईन सूचनांचे व्यवस्थित पालन केलंत तर ही मोहिम तुम्ही फत्ते कराल यात मला तिळमात्र शंका नाही. तुम्ही सर्व जिगरबाज आहातच.... मी दिलेल्या ऑन लाईन प्रशिक्षण सुचनांनी तुमची हिंमत वाढली असेल. काही अर्जंट मोहिमेवर मी अडकलो असल्याने प्रत्यक्ष गाईडन्स देऊन मोहिमेत भाग घेण्यासाठी मी उपलब्ध नसल्याबद्दल दिलगीर आहे. पण देहाने नसलो तरी मनाने मी तुमच्या बरोबरच असेन याची खात्री बाळगा... मोहीम संपली की तुमच्याशी संपर्क साधीनच...‘‘ऑल द बेस्ट गाईज...!’’. मी समारोप करण्याच्या दृष्टीने म्हटलं.

‘‘खूप खूप धन्यवाद.कमांडर साहेब... आपण प्रत्यक्ष आमच्या बरोबर असता तर आमची हिंमत कितीतरी वाढली असती... ट्रेकिंगच्या जगतात आपण बादशहा समजला जाता सर.... शेकडो दुर्गम शिखरे आपण आतापर्यंत काबीज केली आहेत.... पण महत्वाच्या लष्करी मोहिमेमुळे आपण येऊ शकत नाही. पण आपण घेतलेल्या लाख मोलाच्या ऑन लाईन सूचनांमुळे आमची हिंमत शेकडो पटीने वाढली आहे...आपण आमच्या बरोबर आहातच सर, असं आम्ही समजतो... पुढच्या वेळी आपण आमच्या बरोबर असालच याची खात्री आहे. आपल्या लष्करी मोहिमेला आमच्या हार्दिक शुभेच्छा सर... जयहिंद...!’’ ट्रेकिंग मोहिमेच्या कॅप्टन अजयचा आवाज थांबला.

मी एक दीर्घ सुस्कारा सोडून मोबाईल बंद केला आणि म्हणालो.... आय ॲम रेडी..... चल डॉक....!

नितीनने .... माझ्या सर्जन डॉक्टर मित्राने मी बसलोअसलेली माझी व्हीलचेअर शांतपणे ऑपरेशन थिएटरच्या रोखाने न्यायला सुरूवात केली....

.... अलीकडेच सीमेवर झालेल्या चकमकीत जायबंदी झालेले माझे दोन्ही पाय ॲम्प्युट करण्याची वेळ अवघ्या काही मिनिटांवर येऊन ठेपली होती....!

**- संजीव मांद्रेकर**

## वृक्ष

सकाळी फिरायला गेले असता
कुजबुज आली कानी
मिळूनी सारी झाडे
बोलत, होती पानो पानी.
उभे आहोत तोऱ्यात आत्ता
पण आपलं काही खरं नाही
एखाद्या बिल्डरची नजर पडता
राहणार इथे काहीच नाही
काँक्रीटचा आहे जमाना सारा
आपल्याला आता काय भाव?
तोड,तोड, तोडतात वृक्षे
मग वृक्षारोपणाचा आणतात आव
वृक्ष तोडून माणसे
कागद बनवतात
वृक्ष तोडू नका असे
कागदावरच लिहितात
पर्यावरणाचा करूनी ऱ्हास
करतायेत स्वतःचीच दैना
आमच्या वाचून श्वासच नाही
हे कळत कसं नाही यांना !
प्रवाहाच्या विरोधात जाऊन
ऋतुही सारे बदलतायेत
श्रावण जातोय कोरडा
कार्तिकाला ढग येतायत
हेरिकेनचा इंगा आणि
सुनामीचा तडाखा
स्वतः भोवतीच मानव घालतोय
हाहाकाराचा विळखा!!
सृष्टी दोन्ही हाताने देते
घेऊया ओंजळ भरून
जपूया हा अमूल्य ठेवा
निसर्गाचा मान राखून...

**- सौ. सुजाता साठे**